# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.२८/०१/२०२५

आरोपी इतर लोकसेवक माणिकराव तारासिंग चव्हाण, वय ४४ वर्ष,व्यवसाय-रोजगार सेवक (कंत्राटी) वरदरी बु. रा.वरदरी (बु) ता.मालेगांव जि.वाशिम यांना १,२००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | आरोपी इतर लोकसेवक माणिकराव तारासिंग चव्हाण, वय ४४ वर्ष,व्यवसाय-रोजगार सेवक (कंत्राटी) वरदरी बु.रा.वरदरी (बु) ता.मालेगांव जि.वाशिम |
| लाच मागणी रक्कम | १,२००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,२००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या सिंचन विहीरीचे मस्टर तयार करुन पंचायत समिती मालेगाव येथे पाठवून रक्कम बॅकेत जमा करण्याकरीता तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | बालाजी तिप्पलवाड, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या सिंचन विहीरीचे मस्टर तयार करुन पंचायत समिती मालेगाव येथे पाठवून रक्कम बॅकेत जमा करण्याकरीता १,२००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. १७/०१/२०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. २७/०१/२०२५ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान माणिक चव्हाण,ग्रामरोजागार सेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या सिंचन विहीरीचे मस्टर तयार करुन पंचायत समिती मालेगाव येथे पाठवून रक्कम बॅकेत जमा करण्याकरीता १,२००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवील्याचे निष्पन्न झाले.

दि. २८/०१/२०२५ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता माणिक चव्हाण,ग्रामरोजागार सेवक यांनी तक्रारदार यांच्या कडून लाच रक्कम १,२००/- रुपये स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन जउळका रेल्वे जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक सचिंन्द्र शिंदे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनात बालाजी तिप्पलवाड,प्रभारी पोलीस उपअधिक्षक ला.प्र.वि. वाशिम व अंमलदार पोहवा.आसिफ शेख, विनोद मारकंडे,पोना.योगेश खोटे,समाधान मोघाड चापोना मिलींद चन्नकेशला ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बालाजी आर तिप्पलवाड,प्रभारी पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं.- १०६४
बालाजी आर.तिप्पलवाड -७०२०१५५३११

( बालाजी आर तिप्पलवाड )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम